# कोविड 19 या साथीच्या रोगाकरीता आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी विषयक

## मार्गदर्शक सूचना



महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

आयुष संचालनालय
महाराष्ट्र राज्य

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

## टास्कफोर्स ऑन आयुष फॉर कोविड 19

(वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग महाराष्ट्र शासन द्वारा निर्गमित)

## सामान्य प्रतिबंधात्मक उपाय

१) वैयक्तिक स्वच्छतेचे व्यवस्थित पालन करावे.

२) वारंवार साबणाने हात वीस सेकंद पर्यंत धुवावे.

३) श्वसनाविषयक नियम पाळावेत - खोकताना व शिंकताना तोंड झाकावे.

४) ज्या व्यक्ती आजारी आहेत किंवा ज्यांना सर्दी खोकला इत्यादी आजाराची लक्षणे आहेत अशा व्यक्तींशी जवळचा संपर्क टाळावा.

५) जिवंत प्राण्यांशी संपर्क व कच्चे न शिजवलेले मांस खाणे टाळा.

६) पशुपालन गृह तसेच जिवंत पशु विक्री केंद्र किंवा कत्तल खाने या ठिकाणी प्रवास टाळावा.

**याशिवाय खालील नमूद विशिष्ट आयुष उपाययोजनांचे पालन करावे.**

- भोजन हे ताजे उष्ण व पचायला हलके असावे. त्यात आख्खी धान्ये आणि ऋतूनुसार भाज्या इत्यादींचा समावेश असावा.
- तुळशीची पाने, ठेचलेले आले व हळद ही द्रव्ये पाण्यात उकळून ते पाणी वारंवार पिणे फायदेशीर आहे.
- सर्दी व खोकल्यासाठी चिमूटभर काळीमिरी चूर्ण मधातून सेवन करणे फायदेशीर आहे.
- तसेच उपरोक्त लक्षणांमध्ये तुळस (ऑसीमम सँक्टम), गुडुची / गुळवेल (टीनोस्पोरा कॉर्डीफोलीया), आले (झिंझीबेर ऑफीसिनेल) आणि हळद (करकूमा लाँगा) या सामान्य औषधी वनस्पती उपयुक्त आहेत.
- थंड, फ्रिजमध्ये ठेवलेले व पचायला जड पदार्थ टाळणे हितकारक आहे.
- थंड वा-याचा थेट संपर्क टाळणे हे नेहमी फायदेशीर आहे.
- पर्याप्त विश्रांती व वेळेत झोपणे हितकारक आहे.
- प्रशिक्षित योग तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योगासने व प्राणायाम यांचा सराव करावा.
- मुगाचे कढण / सुप / पाणी - मुग डाळ पाण्यात उकळवून तयार केलेले मुगाचे गरम कढण / सुप / पाणी प्यावे, ते पोषक व पथ्यकर आहे.
- सुवर्ण दुग्ध/दूध - १५० मिलीलिटर गरम दुधात अर्धा चमचा हळद व अर्धा चमचा सुंठीचे चुर्ण मिसळून हे दूध दिवसातून एकदा किंवा दोनदा प्यावे.

## I. रोगप्रतिकार शक्ती वाढीसाठी व रोग प्रतिबंधासाठी आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी उपचार

### अ) आयुर्वेदिक औषधी

१) संशमनी वटी (५०० मिली ग्रॅम) - १ गोळी दिवसातून दोनदा - १५ दिवस

२) आयुष क्वाथ - तुळस ४ भाग, सूंठ दोन भाग, दालचिनी दोन भाग व काळीमिरी १ भाग या द्रव्यांच्या भरड चुर्णाने फांट तयार करणे.(वरील औषधींचे ३ ग्रॅम भरड चुर्ण १०० मिलीलिटर उकळलेल्या पाण्यात मिसळून ५ ते ७ मिनीटे झाकून ठेवणे व गाळून ते पाणी/फांट पिणे. हा फांट सकाळ व संध्याकाळ ताजा बनवून १५ दिवसांसाठी सेवन करावा.

३) च्यवनप्राश १० ग्रॅम (१ मोठा चमचा) सकाळी सेवन करावे. मधूमेही रुग्णांनी साखर विरहित/शुगरफ्री च्यवनप्राश सेवन करावे.

४) सोपे आयुर्वेदीक चिकित्सा उपक्रम -

अ) नस्य/नाका वाटे औषध टाकणे - सकाळ व संध्याकाळ दोन्ही नाकपुडयांमध्ये तिळतेल/खोबरेल तेल किंवा तूप हे बोटाने लावावे/ प्रतिमर्श नस्य करावे.

ब) तेलाने गंडुश/गुळण्या व गरम पाण्याने गुळण्या करणे - तोंडामध्ये 1 मोठा चमचा तिळतेल/खोबरेल तेल घ्यावे. हे तेल न गिळता 2 ते 3 मिनीटे गुळण्या कराव्यात व त्यानंतर हे तेल थुंकावे व गरम पाण्याने चुळ भरावी. असे दिवसातून एकदा किंवा दोनदा करावे. गरम पाण्याने देखील एकदा किंवा दोनदा गुळण्या कराव्यात .

### ब) युनानी औषधी

१) काढा/जोशंदा - ( घटक द्रव्ये - बिहीदाना,उन्नाब, सपीस्तान, करंजवा ) -बिहीदाना ०५ ग्रॅम, बर्गे गावजबान ०७ ग्रॅम, उन्नाब ०७ दाणे, सपीस्तान ०७ दाणे,दालचिनी ०३ ग्रॅम, बनपशा ०५ ग्रॅम यांचा काढा/जोशंदा. या घटकद्रव्यांना २५० मिलीलिटर पाण्यामध्ये १५ मिनीटे उकळवावे व गरम असताना चहाप्रमाणे दिवसातून ०१ किंवा ०२ वेळा १५ दिवसांकरिता सेवन करावे.

२) खमीरा मरवारीद - दुधासोबत ०५ ग्रॅम दिवसातून दोनदा सेवन करावे.

### क) होमिओपॅथीक औषधी

अर्सेनिकम अल्बम 30 - ४ ग्लोब्युल्स /गोळया उपाशीपोटी दिवसातून दोनदा, असे तीन दिवस सलग सेवन करावे. एका महिन्याच्या अंतराने पुन्हा हा तीन दिवसांचा औषधाचा कोर्स करावा.

(वरील सर्व उपक्रम हे आपआपल्या सोयीनुसार शक्य तेवढे पालन करावे.)

## II. कोविड १९ समान लक्षणे असणाऱ्या रोगांसाठी आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी उपचार

### अ) आयुर्वेदिक औषधी

१) टॅबलेट आयुष ६४ -(५०० मिली ग्रॅम) - २ गोळया दिवसातून २ वेळा १५ दिवस सेवन करणे.

२) अगस्त्य हरीतकी - ५ ग्रॅम दिवसातून २ वेळा गरम पाण्यासोबत १५ दिवस सेवन करणे.

३) अणूतेल/तीळतेल - दोन थेंब प्रतिदिन सकाळी प्रत्येक नाकपुडीत टाकणे.

४) ताजी पुदीन्याची पाने किंवा ओवा पाण्यात उकळून त्याची वाफ दिवसातून एकदा / दोनदा घेणे.

५) खोकला व घसा खवखवणे याकरीता नैसर्गिक साखर अथवा मध यामध्ये लवंगचुर्ण मिसळून दिवसातून २ ते ३ वेळा घेणे.

### ब) युनानी औषधी

१) अर्के अजीब (अर्धा ग्लास पाण्यामध्ये ०५ थेंब औषध मिसळून गुळण्या कराव्या) हा उपक्रम १५ दिवस करावा. हे मिश्रण घरीदेखील प्रत्येकी ०५ ग्रॅम सत्ते (सत्व) अजवाइन,सत्ते (सत्व) पुदीना व सत्ते (सत्व) कपूर/कफूर एकत्रित करुन तयार करता येते.

२) तिर्यक अर्बा - हब्बुल घर/ (लॉरस नोबीलीस फळ), ज्युन्तीआना (ज्येन्शीआना ल्युटीयाना मूळ), मूर (कॉम्मीफोरा माईर डींक ), झरवंद तवील (ॲरीस्टोलोकीया लॉंगा मूळ). तयार करण्याचा विधी - या सर्व घटकद्रव्यांचे चूर्ण तयार करुन तूपामध्ये परतावे व मध गरम करुन त्यामध्ये ही औषधे मिसळावीत. याचा वापर चूर्ण स्वरुपातही केला जावू शकतो. ०१ चमचा चूर्ण सकाळी घ्यावे. हे औषध १५ दिवस घ्यावे.

### क) होमिओपॅथीक औषधी

अर्सेनिकम अल्बम 30 - ४ ग्लोब्युल्स /गोळया उपाशीपोटी दिवसातून दोनदा, असे तीन दिवस सलग सेवन करावे. एका महिन्याच्या अंतराने पुन्हा हा तीन दिवसांचा औषधाचा कोर्स करावा.

तसेच ब्रायोनिया अल्बा (Bryonia alba),-हस टॉक्सीको डेन्ड्रान (Rhus toxico Dendron), बेलॉडोना जेलसेमियम (Belladonna Gelesemium), युप्याटोरियम परफॉलिएटम (Eupatorium perfoliatum), हि औषधे देखील सर्दी खोकला/फ्लू समान रोगांमध्ये चिकित्सेसाठी उपयुक्त ठरली आहेत.

(उपरोक्त सर्व औषधे तज्ञ आयुर्वेदिक, युनानी व होमिओपॅथीक डॉक्टरांच्या सल्यानंतरच घ्यावीत)

## III. कोविड १९ पॉझीटीव्ह अलाक्षणिक, चिकित्सालयीन तपासणीनुसार स्थिर (क्लिनीकली स्टेबल) असणाऱ्या व इतर वर्तमान गंभीर व्याधी (प्रि एक्झीसटींग को-मॉरबीडीटीज) रहित रुग्णांकरीता प्रस्थापीत चिकित्सेला पुरक आयुर्वेद व होमिओपॅथी उपचार

### अ) आयुर्वेदिक औषधी

१) टॅबलेट आयुष ६४ - ५०० मिली ग्रॅम - २ गोळया दिवसातून दोन वेळा १५ दिवस सेवन करणे

**किंवा**

टॅबलेट सुदर्शन घनवटी - २५० मिलीग्रॅम - २ गोळया दिवसातून २ वेळा १५ दिवस सेवन करणे.

२) अगस्त्य हरीतकी - ५ ग्रॅम दिवसातून २ वेळा गरम पाण्यासोबत १५ दिवस सेवन करणे.

३) सोपे आयुर्वेदिक चिकित्सा उपक्रम -

अ) नस्य/नाका वाटे औषध टाकणे - सकाळ व संध्याकाळ दोन्ही नाकपुडयांमध्ये तिळतेल/खोबरेल तेल किंवा तूप हे बोटाने लावावे/ प्रतिमर्श नस्य करावे.

ब) तेलाने गंडुश/गुळण्या व गरम पाण्याने गुळण्या करणे - तोंडामध्ये १ मोठा चमचा तिळतेल/खोबरेल तेल घ्यावे.हे तेल न गिळता २ ते ३ मिनीटे गुळण्या कराव्यात व त्यानंतर हे तेल थुंकावे व गरम पाण्याने चुळ भरावी. असे दिवसातून दोनदा / तीनदा करावे. गरम पाण्याने देखील दोनदा/तीनदा गुळण्या कराव्यात .

क) गरम पाण्याची वाफ दिवसातून दोनदा / तीनदा घ्यावी.

(उपरोक्त सामान्य प्रतिबंधात्मक उपायांचे देखील पालन करावे.)

### ब) होमिओपॅथीक औषधी

कोविड १९ समान रोगांच्या लक्षणांच्या चिकित्सेकरीता उपरोक्त नमूद औषधांचा वापर हा प्रस्थापित चिकित्सेस पुरक चिकित्सा म्हणून केला जावू शकतो.

(उपरोक्त सर्व औषधे तज्ञ आयुर्वेदिक व होमिओपॅथीक डॉक्टरांच्या सल्यानंतरच घ्यावीत)

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

आयुष संचालनालय
महाराष्ट्र राज्य

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

# टास्कफोर्स ऑन आयुष फॉर कोविड 19

(वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग महाराष्ट्र शासन द्वारा निर्गमित)

Design by State Health Information, Education and Communication Bureau, Pune